**आरोपीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा साक्षीपुरावा**

मी शपथेवरती कथन करतो की,

**माझे नाव** – **अकबर बख्तावर मोमीन,**

**वय** – ६० वर्षे,

**व्यवसाय** – प्लॉटींग व्यवसाय,

**पत्ता** – अलंकार कॉलनी, मिरज, जि. सांगली.

**सरतपास आरोपीतर्फे वकील श्री. व्ही. एस. उदगावे यांचेतर्फे:–**

१. मी प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी यांना सन १९९९ पासून ओळखतो, कारण माझे सासरे हाफीजभाई धत्तुरे हे आमदार असताना त्यांच्या वॉर्डमधील कामे फिर्यादी पाहत होते. ती कामे त्यांना माझ्या मार्फतीने मिळत होती. प्रस्तुतचे प्रकरण त्यांनी मी त्यांच्याकडून तीस लाख रुपये घेतलेले आहेत यासाठी दाखल केले आहे. मात्र मी अशी कोणतीही रक्कम त्यांच्याकडून घेतलेली नाही.

२. मी प्लॉटींगचा व्यवसाय करतो हे फिर्यादी यांना माहीत होते. त्यामुळे ते स्वतःहून माझ्याकडे आले व त्यांनी मला सांगितले की तुमच्या व्यवसायामध्ये मला माझे पैसे गुंतवायचे आहेत. त्याप्रमाणे त्यांनी मला आरटीजीएसने सोळा लाख रुपये दिले होते. मात्र मिरज सांगलीमध्ये पुराच्या पाण्यामुळे माझा व्यवसाय कमी झाला होता. तसेच त्यानंतर लॉकडाउन लागला. त्यामुळे माझे व्यवसाय ठप्प झाला. त्यानंतर मी फिर्यादी यांना त्यांचे सोळा लाख रुपये परत करण्यास तयार होतो. परंतु त्यांनी अचानक माझ्याकडे तीस लाखाची मागणी केली. मी फिर्यादी यांना सोळा लाख रुपये परत करण्यासाठी सिक्युरिटीपोटी एक कोरा धनादेश दिला होता. तो धनादेश त्यांनी मला

विश्वासात न घेतला तीस लाख रुपये रक्कम भरून बँकेत वटण्यासाठी टाकला. काही दिवसांनी मला फिर्यादीच्या वकिलांची नोटीस आल्यानंतर माझ्या धनादेशाच्या झालेल्या गैरवापराबाबत मला समजले. मी आरोपीकडून घेतलेले सोळा लाख रुपये आज देखील परत करण्यास तयार आहे. तरीदेखील फिर्यादीने माझ्याविरुद्ध खोटी फिर्याद न्यायालयात दाखल केली आहे.

**सरतपास संपला.**

फिर्यादी व त्यांचे वकील श्री. व्ही. एस. खंडागळे यांनी त्यांचे सिनिअर श्री. पाटील वकील काही वेळात येत आहेत तरी तो पर्यंत उलटतपास तहकूब ठेवावा अशी विनंती केली. सबब त्यांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास काही वेळाकरिता तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ROHINI SAMBHAJI PATIL
Digitally signed by ROHINI SAMBHAJI PATIL
Date: 2026.01.30 17:54:50 +0530

**दि.३१/०१/२०२६.** **(रोहिणी सं. पाटील)**
**सांगली.** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र. १),**
**सांगली.**

**सदर साक्षीदाराचा शपथेवर उलटतपास फिर्यादीतर्फे वकील श्री. पाटील –**

३. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादीला मागील वीस ते पंचवीस वर्षापासून ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, माझे व आरोपीचे मैत्रीचे घरोबाचे घनिष्ठ संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमचे एकमेकांच्या घरी येणे–जाणे होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२० मध्ये मी फिर्यादीकडे माझ्या घरगुती व वैद्यकीय अडचणीसाठी रक्कम रुपये तीस लाखाची मागणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने मला माझ्या

अडचणीमुळे आरटीजीएसने रक्कम रुपये सोळा लाख त्यांच्या सेव्हिंग खाते क्र. ११८७५ ने दिले होते.

४. हे म्हणणे खरे आहे की, मला कोव्हीड कालावधी सन २०२० मध्ये कोरोना झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, मला त्या दरम्यान हॉस्पिटलमध्ये राहून उपचार घ्यावे लागले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला कोरोनाच्या उपचारादरम्यान भरपूर वैद्यकीय खर्च आलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी माझा वैद्यकीय उपचारावर झालेल्या खर्चाची माहिती फिर्यादीला दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यामुळे फिर्यादीला आर्थिक मदत करण्याची विनंती केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मला सदर कालावधीमध्ये फिर्यादीने रक्कम रूपये चौदा लाख रोख दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीकडून एकूण रक्कम रूपये तीस लाख घेतलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरील सर्व रक्कम दि. ३१.०३.२०२१ अखेर परत करण्याची फिर्यादीस हमी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मला सदरील तारखेला रक्कम देणे झाले नाही त्यामुळे मी फिर्यादीला विनंती केल्याने फिर्यादीने मला सदरील रक्कमेच्या परतफेडीसाठी मला आणखी मुदत वाढ दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या अडचणीचा विचार करून फिर्यादी ऑक्टोंबर २०२३ पर्यंत रक्कमेच्या परतफेडीसाठी थांबले होते.

५. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.०६.११.२०२३ रोजी धनादेश क्र. ९६६८ हा रक्कम रूपये तीस लाख भरून फिर्यादीला दिला होता. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मी फिर्यादीला कोरा धनादेश दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरील धनादेश

फिर्यादीला देतेवेळी तो नक्की वटेल अशी फिर्यादीला हमी दिली होती.

प्रश्न – फिर्यादीने दि.०६.११.२०२३ रोजी सदरील धनादेश त्यांचे बँक सांगली अर्बन बँक शाखा माधवनगर येथे वटण्यासाठी टाकला असता तो अपर्याप्त निधी म्हणून परत आला होता हे बरोबर आहे काय?

उत्तर – होय, पण मला त्याबाबत नंतर समजले होते.

६. हे म्हणणे खरे नाही की, सदरील धनादेश न वटल्याने मला फिर्यादीने दि. २८.११.२०२३ रोजी धनादेशाची रक्कम मागणीसाठी नोटीस पाठवली होती. हे म्हणणे खरे आहे की, मला सदरील नोटीस पोहचली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरील नोटीस मिळाल्यानंतर देखील मी धनादेशाची रक्कम आरोपीला परत दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीला खोटा आशय नमूद करून ॲड. श्री. उदगावे यांचेमार्फतीने उत्तरी नोटीस पाठवली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीची हेतुपुरस्सर फसवणूक केलेली आहे.

७. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे माझे सासरे हाफीजभाई धत्तुरे यांच्या वॉर्डमधील कामे फिर्यादीला माझ्या मार्फतीने मिळत होती हे दाखवणारा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२० मध्ये मी प्लॉटींगचा व्यवसाय करत होतो हे दाखवणारा माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. मी माझ्या प्लॉटींग व्यवसायाचा पुरावा न्यायालयात दाखल करण्यास तयार आहे. माझ्याकडे फिर्यादीने प्लॉटींग व्यवसायामध्ये रक्कम गुंतवण्यासाठी पैसे दिले होते हे दाखवणारा कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादीकडून

ज्या वेळी पैसे घेतले होते त्यावेळी सांगली जिल्ह्यामध्ये पूर आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी सन २०२० ते २०२३ चे दरम्यान कोणताही प्लॉटींगचा व्यवसाय करत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मला फिर्यादीची हातउसने घेतलेली रक्कम परत द्यायला लागू नये म्हणून मी माझा प्लॉटींग व्यवसाय कोरोना काळामध्ये ठप्प झाला असे खोटे सांगत आहे. मी कोरोना काळामध्ये मला प्लॉटींग व्यवसायामध्ये किती नुकसान झाले हे दाखवण्याकामी कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल करण्यास तयार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला फिर्यादीकडून घेतलेली रक्कम परत करायला लागू नये म्हणून आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ROHINI SAMBHAJI PATIL
Digitally signed by ROHINI SAMBHAJI PATIL
Date: 2026.01.30 17:54:56 +0530

**दि.३१/०१/२०२६.** **(रोहिणी सं. पाटील)**

**सांगली.** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र. १),**

**सांगली.**